# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date – 12 May 2024

Time 18.10 to 18.20

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक – १२ मे २०२४ सायंकाळी ६.१०**

****

- लोकसभा निवडणुकीच्या चौथ्या टप्प्यात उद्या मतदान–राज्यातल्या ११ मतदार संघातल्या मतदान केंद्रांकडे मतदान पथकं रवाना
- मराठवाड्यात जालना, बीड तसंच औरंगाबाद लोकसभा मतदार संघात मतदान प्रक्रियेसाठी प्रशासकीय यंत्रणा सज्ज
- नाशिकचे काँग्रेस जिल्हाध्यक्ष तुषार शेवाळे यांचं सहा वर्षांसाठी पक्षातून निलंबन

आणि

- छत्रपती संभाजीनगर तसंच जालना इथल्या दोघांना पाच पिस्तुलांसह धुळ्यात अटक

****

लोकसभा निवडणुकीच्या चौथ्या टप्प्यात नऊ राज्यं आणि एका केंद्रशासित प्रदेशातल्या मिळून ९६ मतदारसंघांत उद्या मतदान होत आहे. यात मराठवाड्यातल्या जालना, बीड आणि औरंगाबाद लोकसभा मतदार संघासह राज्यातील पुणे, शिरुर, मावळ, अहमदनगर, शिर्डी, नंदुरबार, जळगाव आणि रावेर या एकूण ११ मतदारसंघाचा समावेश आहे.

मतदारांना मतदानाचा हक्क बजावण्यासाठी मतदान केंद्रावर मतदार ओळखपत्रासह छायाचित्र असलेली ओळखपत्र पुरावा म्हणून दाखवता येणार आहेत. यामध्ये आधार कार्ड, पॅन कार्ड, वाहन चालक परवाना, दिव्यांग व्यक्ती ओळखपत्र, कामगार आरोग्यविमा स्मार्ट कार्ड, पासपोर्ट, निवृत्ती वेतन दस्तऐवज, मनरेगा रोजगार ओळखपत्र, बँक किंवा टपाल विभागाचे छायाचित्र असलेले खातेपुस्तक, राष्ट्रीय लोकसंख्या नोंदवही स्मार्ट कार्ड, आदी पुराव्यांचा समावेश आहे.

मतदारांना मतदारयादीत आपलं नाव शोधण्यासाठी निवडणूक विभागानं आपल्या संकेतस्थळावर सुविधा उपलब्ध करून दिली आहे. त्याशिवाय मोबाइल एसएमएसद्वारे मतदारांना ही सुविधा देण्यात आली आहे. यासाठी मतदारांनी मोबाइलच्या मेसेज बॉक्समध्ये इंग्रजीत ईसीआय स्पेस आणि त्यानंतर आपला मतदार ओळखपत्राचा क्रमांक लिहून १९५० या क्रमांकावर मेसेज पाठवायचा आहे. या मेसेजच्या उत्तरात मतदार यादी क्रमांक आणि मतदार क्रमांक तत्काळ पाठवला जातो.

****

छत्रपती संभाजीनगर इथून आज औरंगाबाद लोकसभा मतदार संघात तसंच जालना लोकसभा मतदार संघात समाविष्ट मतदान केंद्रांवर मतदान पथकं रवाना झाली. जिल्ह्यात ३ हजार ८५ मतदान केंद्रं असून त्यात जालना लोकसभा मतदार संघात १ हजार ४५ मतदान केंद्रांचा समावेश आहे. जिल्ह्यात महिला कर्मचारी संचलित १६ मतदान केंद्रं आहेत. त्यातील चार जालना लोकसभा अंतर्गत तर औरंगाबाद लोकसभा अंतर्गत १२ मतदान केंद्रं आहेत. ३८८ बससह सुमारे एक हजार सहाशे वाहनांतून या पथकांना आपापल्या मतदान केंद्रांवर पोहोचवण्यात येत आहे.

****

बीड लोकसभा मतदार संघातल्या २ हजार ३५५ मतदान केंद्रांवर सर्व केंद्राध्यक्ष आणि सहाय्यक आवश्यक साहित्यासह रवाना झाले. कृषी उत्पन्न बाजार समिती परिसरात जिल्हा निवडणूक अधिकारी दीपा मुधोळ-मुंडे यांच्या उपस्थितीत या साहित्याचं वितरण करण्यात आल्याचं, आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

****

जालना लोकसभा मतदार संघात दोन हजार ६१ मतदान केंद्रांवर मतदारसंघात १९ लाख ६७ हजार ५७४ मतदार आपला मतदानाचा हक्क बजावणार आहेत. यामध्ये महिला अधिकारी संचलित सात सखी मतदान केंद्र, तरुण अधिकारी संचलित ८ मतदान केंद्रं तर दिव्यांग अधिकारी संचलित सहा मतदान केंद्रांचा समावेश आहे. या मतदान केंद्रांसाठी ईव्हीएम आणि इतर साहित्याचं जालना औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत विधानसभा मतदार संघनिहाय वितरण आज करण्यात आलं. त्यानंतर मतदान पथकं आपापल्या केंद्रांकडे रवाना झाली.

प्रशासनाकडून जिल्ह्यातल्या एक हजार ३६ मतदान केंद्रावर वेब कास्टिंग करण्यात येणार आहे. सर्व मतदान केंद्रांवर अत्यावश्यक सुविधांसह उन्हाची स्थिती लक्षात घेता इतर व्यवस्था करण्यात आली आहे. कुठलाही अनुचित प्रकार घडू नये याकरिता पोलीस प्रशासनाकडून आवश्यक बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

****

मतदान केंद्रांवर पोहोचल्यावर मतदान केंद्राध्यक्षांना विविध माहितीची नोंद ठेवावी लागते. जालना जिल्हा प्रशासनाने यासाठी अभिनव कल्पना राबवली आहे. याबाबत अधिक माहिती देत आहेत, आमचे वार्ताहर –

***मतदान पथकास सर्व साहित्य मिळालं का, मतदान यंत्रांची जोडणी झाली का, अभिरूप मतदान करून पाहिलं का, आवश्यक सर्व अहवाल तयार केले का अशा विविध माहितीसह सकाळी सात ते सायंकाळी सहापर्यंतच्या प्रत्येक टप्प्यातील मतदानाची टक्केवारीही लेखी स्वरुपात नोंदवावी लागते. जालन्याचे जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी या नोंदींसाठी वेगळी संकल्पना राबवली आहे. मतदान पथकाला दिलेल्या पिण्याचं पाणी थंड ठेवणाऱ्या बाटल्यांवर या सगळ्या नोंदी मार्करद्वारे करता येणार आहेत. त्यामुळे एकही मतदान प्रक्रियेतला कोणताही टप्पा सुटण्याची शक्यता नाही. जिल्हाधिकारी पांचाळ यांच्या या नवीन प्रयोगाचं भारत निवडणूक आयोगानेही कौतुक केलं आहे.***

***बाबासाहेब म्हस्के आकाशवाणी बातम्यांसाठी जालना***

****

अहमदनगर इथंही निवडणुकीसाठी प्रशासकीय यंत्रणा सज्ज झाली असून आज अधिकारी कर्मचाऱ्यांना ई व्ही एम आणि इतर साहित्याचं वाटप करण्यात आलं. शिर्डी लोकसभा मतदारसंघात एक हजार ७०८ इतकी मतदान केंद्रं असून ८ हजार ५३० मतदान अधिकारी आणि कर्मचारी नियुक्त करण्यात आले आहेत. २११ बस आणि इतर ४६९ वाहनांतून ही सर्व पथकं आपल्या निर्धारित मतदान केंद्रांवर दाखल होत आहेत.

****

नाशिकचे काँग्रेस जिल्हाध्यक्ष तुषार शेवाळे यांना सहा वर्षांसाठी काँग्रेस पक्षातून निलंबित करण्यात आलं आहे. लोकसभा निवडणुकीत पक्षविरोधी कारवाया केल्याचं निदर्शनास आल्यानं त्यांच्यावर ही कारवाई करण्यात आल्याचं महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीनं दिलेल्या पत्रकात म्हटलं आहे. दरम्यान, शेवाळे यांनी आज धुळे इथल्या कार्यक्रमात भारतीय जनता पक्षात प्रवेश केल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

****

'लोकनिर्णय महाराष्ट्राचा' या कार्यक्रमात आजच्या भागात आपण 'मुंबई उत्तर' लोकसभा मतदार संघांचा आढावा घेणार आहोत. आकाशवाणीच्या मुंबई केंद्रावरून संध्याकाळी सव्वा सात वाजता प्रसारित होणारा हा कार्यक्रम सामाजिक संपर्क माध्यमांवरूनही ऐकता येईल.

****

लोकसभा निवडणुकिच्या अनुषंगानं राज्यात तसंच महाराष्ट्र राज्याच्या सीमेलगतच्या निवडणूक होणाऱ्या मतदान क्षेत्रात मतदार असलेले कामगार, अधिकारी, कर्मचारी यांना, जरी ते कामानिमित्त निवडणूक होणाऱ्या क्षेत्राबाहेर कार्यरत असले तरीही निवडणुकीच्या दिवशी मतदानाचा हक्क बजावण्यासाठी भर पगारी सुट्टी देण्यात यावी, असे निर्देश मुंबई शहराचे जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी संजय यादव यांनी दिले आहेत. मुंबई शहरात येत्या २० मे रोजी मतदान होणार आहे. मतदानासाठी पूर्ण दिवस सुट्टी देणं शक्य नसेल तर मतदान क्षेत्रातील कामगारांना मतदानाचा हक्क बजावण्यासाठी मतदानाच्या दिवशी संस्थेतील मतदारांना दोन ते तीन तासांची सवलत देण्यात यावी. याबाबत जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी यांची परवानगी घेणं आवश्यक आहे, असंही यादव यांनी आपल्या आदेशात म्हटलं आहे.

****

धुळे जिल्ह्यातल्या शिरपूर तालुक्यात दोन जणांना ५ गावठी पिस्तूल आणि जिवंत काडतुसांसह धुळे पोलिसांनी ताब्यात घेतलं आहे. शिरपूरचे पोलिस निरीक्षक श्रीराम पवार यांना याबाबत गोपनीय माहिती प्राप्त झाल्यानंतर त्यांच्या पथकानं मध्य प्रदेशातून येणाऱ्या रस्त्यावर शिरपूर तालुक्यातील कामखेडा फाट्याजवळ सापळा लावला, यावेळी दुचाकीवरून येणाऱ्या दोघा संशयितांना थांबवण्याचा प्रयत्न केला असता, त्यांनी दुचाकी सोडून पसार होण्याचा प्रयत्न केला, मात्र पोलिसांनी

पाठलाग करून त्यांना ताब्यात घेतल्याचं पोलिस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांनी सांगितलं. या दोघांपैकी एक जण छत्रपती संभाजीनगरचा तर दुसरा जालना इथला रहिवासी असल्याचं तपासात समोर आलं आहे

****

जागतिक परिचारिका दिवस आज सर्वत्र साजरा होत आहे. आद्य परिचारिका फ्लॉरेन्स नाईटिंगेल यांच्या जन्मदिनाचं औचित्य साधत हा दिवस साजरा केला जातो. छत्रपती संभाजीनगर इथल्या घाटी रुग्णालयात या निमित्तानं विशेष कार्यक्रम घेण्यात आला. हिंगोलीतही शासकीय नर्सिंग महाविद्यालयात परिचारिका दिवस साजरा झाला. या वेळी अधिकारी, कर्मचारी मोठ्या संख्येनं उपस्थित होते.

नांदेड जिल्ह्यात वैद्यकीय अधिक्षक डॉ प्रताप चव्हाण यांच्या मार्गदर्शनानुसार भोकर ग्रामीण रुग्णालयात जागतिक परिचारिका दिन साजरा करण्यात आला.

फ्लोरोन्स नाइटिंगेल यांच्या प्रतिमेला यावेळी पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आलं.

****

समाजाच्या उन्नतीसाठी जी माणसं झिजली त्यात गोविंदभाई श्रॉफ यांचं नाव अग्रस्थानी असून कर्तृत्व भावनेतून साक्षरता अभियानाकडे पाहण्याची व्यापक दृष्टी गोविंद भाईंकडे होती, असं प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक ऋषिकेश कांबळे यांनी केलं आहे. 'साक्षरता अभियानातून कौशल्याचा ध्यास-पद्मविभूषण गोविंद भाई श्रॉफ' या पुस्तकाचं प्रकाशन आज कांबळे यांच्या हस्ते स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा संशोधन संस्थेत झालं, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी प्रल्हाद लुलेकर तसंच जीवन देसाई यांनीही आपलं मनोगत व्यक्त केलं.

****

नांदेड शहरासह जिल्ह्यातील विविध भागात आज सायंकाळी साडेचार वाजेपासून मुसळधार पाऊस सुरू झाला आहे. या पावसामुळे फळपिकांसह काढणीला आलेल्या उन्हाळी ज्वारीचं नुकसान होण्याची भीती वर्तवली जात आहे. हवामान विभागाने नांदेड जिल्ह्याला तीन दिवस यलो अलर्ट दिला असून, १४ मेपर्यंत हा इशारा कायम आहे.

****

नाशिक जिल्ह्यात गेल्या दोन दिवसांपासून अवकाळी पाऊस पडत आहे. यात वीज कोसळल्यानं शोभा कैलास निकम या महिलेचा मृत्यू झाला. आज सकाळी नाशिक शहराच्या काही भागात पावसाच्या हलक्या सरी कोसळल्याचं याबाबतच्या बातमीत म्हटलं आहे.

****